## प्रकरण ४

## श्री जीव यांच्या प्रहसनांमधील व्यक्तिरेखा

रूपकांमधील कथानक समाजापर्यंत, प्रेक्षकापर्यंत पोहचविण्यासाठी प्रहसनातील व्यक्तिरेखांचा अभिनय करणारी व्यक्ती तेवढीच समर्थ असावी लागते. रूपकात पात्र ही संज्ञा त्या व्यक्तीला दिली जाते जी रूपककाराद्वारे अभिनयासाठी नियोजित केलेली असते.

नाटयकारेणाभिनयर्थामायोजिताः पात्राः। [१]

ही व्यक्ती रूपकाचा अर्थ प्रेक्षकांपर्यंत पोहचविण्यासाठी योग्य असते.

रूपकातील व्यक्तिरेखा या मुख्यतः दोन विभागात विभागलेल्या असतात. १) मुख्य पात्रे, २) गौण पात्रे.

१) मुख्य पात्रे :- प्रामुख्याने रंगमंचावर वावरणारी पात्रे मुख्य असतात. त्यांच्या अस्तित्वाशिवाय रूपक अपूर्ण असते. रूपकातील त्या प्रमुख व्यक्तिरेखा असतात. त्यांच्या अभिनयामुळे आणि स्वभाववैशिष्टयांमुळे त्या व्यक्तिरेखा प्रेक्षकांच्या मनात घर करून राहतात.

प्रहसनांच्या दृष्टिकोनातून, मुख्य पात्रे किंवा व्यक्तिरेखा या त्या त्या प्रहसनांमधील प्रमुख पात्र आहे. एका प्रहसनात अनेक मुख्य पात्रेही असू शकतात. त्याचप्रमाणे नायक, नायिका किंवा खलनायक या व्यक्तिरेखा यामधे येतात.

मुख्य पात्रांमधे १) प्रमुख पुरुष पात्रे २) प्रमुख स्त्री पात्रे असे वर्गीकरण करण्यात येत आहे.

प्रमुख पुरुष पात्रांमधे प्रहसनांचा नायक, त्याच्या जोडीला प्रहसनात रंग भरणारे पुरुष पात्र यांचा समावेश होतो.

१) **विनोद सुंदर (विधि - विपर्यासम्) :-**

स्त्री पुरुष समानता आणि विज्ञानावर अतिविश्वास असणारा हा तत्ववादी नायक आहे. विवाहामुळे स्त्रियांना बंधने पडतात म्हणून विवाहच नको असे त्याचे मत आहे. त्याला स्त्री पुरुष हा भेद करणेच पसंत नाही. स्त्री पुरुष भेदविषयक प्राचीन विचारांवर त्याचा रोष आहे. त्याच्या मते देशाच्या दुर्भाग्याचे प्रमुख कारण हे भेद आहे असे त्याचे म्हणणे आहे.

एको गर्भः स्नेहसन्दर्भ एकोबीजंतुल्यं किन्तु मूल्यं विभिन्नम् ।
पुत्रः प्राप्तस्तातसर्वस्वमान्या पुत्री मूत्रीभावमेतीव घृण्या ॥ [२]

त्याच्या मते स्त्री पुरुषांमधील विषमता नाहीशी झाली की हुंडा, हुंडाबळी,वधूपरीक्षा या सर्व समाजातील स्त्रियांना कमीपणा देणाऱ्या प्रथाही नाहीशा होतील. तो घर्घरकण्ठा या नायिकेच्या सर्व प्रश्नांना उत्तरे देतो. त्याला आपल्या मताच्या समर्थनासाठी वेदातील दाखले देणे आवडते.

पुरुषएवेदं सर्व यद्भूतं यच्च भाव्यम् ।
भूतमध्ये मादृशां भाव्यमध्येचं त्वादृशां सन्निवेशः । [३]

आपल्या मतांचे प्रतिपादन करण्यासाठी तो त्या वेदवाक्यांना उलटसुलट करुन त्यांचे आपल्या सोयीस्कर पद्धतीने अर्थ काढतो.

आपल्या या आदर्शवादाचा तो आपल्या वास्तव जीवनात मात्र उपयोग करु शकत नाही. हा आदर्शवाद तो विसरतो जेव्हा शल्यचिकित्सक त्याचे प्रजनन अंग काढून एका नपुंसकाला पुरुष बनवू इच्छितो. तेव्हा तो घाबरून जातो. त्याचा सारा आदर्शवाद क्षणात मातीमोल ठरतो.

आपले पुरुषत्व वाचवण्यासाठी तो घर्घरकण्ठेला त्यावेळी आपली पत्नी म्हणून मान्य करायलाही मागेपुढे पाहत नाही. त्याला शेवटी हेही मान्य करावे लागते की स्त्रीविषयक उदार धोरण जरी आपण दाखवत असलो तरी प्रत्येकपण स्वतःच्या पत्नीविषयी, तिच्या पातिव्रत्याविषयी आग्रही असतो. विनोदसुंदर स्वतः तरूण

असल्याने व नेता असल्यामुळे त्याने तरुणांना खुश करण्यासाठी आधी ज्या गोष्टी सांगितल्या होत्या त्या चूक होत्या हे तो स्वतःच मान्य करतो.

सत्यमेव ब्रवीमि स्वगृहिण्याः पातिव्रत्यं केन न काङ्क्ष्यते ? तरूणजनमनस्तोषणाय पूर्वे यद् यदुक्तं मया सर्वे तद्विपरीतमेव मे मतम् । [४]

विनोदसुंदर समाजातील नवविचाराने पछाडलेल्या तरूणपिढीचा प्रतिनिधी आहे. ज्यांच्याकडे नवीन विचारांची अंमलबजावणी करण्याची वैचारिक व मानसिक परिपक्वता नाही. केवळ आदर्शाच्या गप्पा मारणे सोपे असले तरी ते आचरणात आणणे किती कठीण आहे हे त्याच्याकडे पाहून समजते.

**रतिकान्त :- (विवाहविडम्बनम् )**

या प्रहसनात भारतीय विवाह संस्था व पद्धती यामधील कुरीतींचे चित्रण केले गेले आहे. या प्रहसनाचा रतिकांत हा नायक असून दोन वेळा विधूर झालेल्या साठ वर्षे वयाच्या या वृद्धाला आपल्या विवाहाची अपेक्षा आहे. स्वतःच्या बहिणीचा स्वतःच्या विवाहाला विरोध आहे हे माहीत असूनही तो विवाहासाठी उत्सुक आहे.

अहो गृहिणीवियुक्तः कियता क्लेशेन रात्रिन्दिवं यापयामि
तज्जानाति भगवानेन । [५]

नोकराला पगारवाढीची लालूच दाखवून तो त्याला विवाहासाठी कन्या शोधायला सांगतो. वृद्धत्वातही कामुकपणाने आंधळया झालेल्या रतिकांतला स्वतःच्या विधवा बहिणीची सावलीही अशुभ वाटू लागते.

त्वमिदानिं गृहाभ्यन्तरं गच्छ । विधवा मुख दर्शनं
यात्रा भङ्गाय भवति । [६]

तो विवाहाच्या लालसेने क्रोधी, विवेकहीन आणि स्वार्थपरायण झाला आहे. या लालसेपायी त्याचा सेवक आणि विवाह जमवणारा मध्यस्थ आपल्याला लुबाडत आहे हेही त्याच्या लक्षात येत नाही.

स्वतःच्या फायदयाआड येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचे तोंड त्याने येनकेन प्रकारेण बंद केले आहे. एका दरिद्री घरातील सुंदर कन्येसाठी त्याच्या विवाहाचा प्रस्ताव

मध्यस्थ मांडतो. त्याच्यासाठी या ना त्या निमित्ताने त्याच्याकडून पैसेही काढतो. विवाहासाठी रतिकांत मध्यस्थाच्या सर्व अटी स्वीकारतो. वृद्धत्व लपवण्यासाठी नोकराकडून प्रसाधन करुन घेण्यासही त्याला कमीपणा वाटत नाही.

समाजातील ज्या व्यक्ती वृद्धपणीही भोगलालसा सोडू इच्छित नाहीत त्या व्यक्तींचे रतिकांत प्रतिनिधित्व करतो आणि आपल्या स्वार्थासाठी समाजातील निर्धन, गरीब व्यक्ती, वधूपिते यांचा फायदा उठवतात.

या प्रहसनात रतिकांतला पैशाकडूनही आणि मानसिकदृष्टयाही खच्ची केले जाते आणि त्या गरीब मुलीचा विवाह योग्य वराशी लावून दिला जातो.

**घटक (विवाह विडम्बनम्) :-**

प्रदेशविशेषे वरवधूनिर्वाचन पूर्वक विवाह घटको घटकपदेनाभिधीय ।[७]

विवाह विडम्बनम् या प्रहसनातील घटक हे एक अतिशय महत्वाचे पात्र आहे. विवाह जुळवणारा हा मध्यस्थ आहे. विवाह जुळवताना मुला मुलींचे वर्णन सांगणे, एकमेकांना योग्य जोडया शोधून देणे हे काम त्याने करणे अपेक्षित आहे. मध्यस्थामध्ये आवश्यक असणारे सर्व गुण त्याच्यात आहेत. इतर सर्व मध्यस्थांप्रमाणेच तो अतिशय लोभीही आहे. या धंदयातून विपुल धनलाभ होत असल्यानेच त्याने उपजीविकेसाठी या व्यवसायाचा स्वीकार केलेला आहे.

रतिकांतला पाहूनच या मध्यस्थाला असे वाटते की चांगला मासा गळाला लागला आहे. रतिकांतला पाहिल्यानंतर तो असे स्पष्ट मत व्यक्त करतो की तू म्हातारा झाला आहेस परंतु मी सर्व व्यवस्थित करीन. मी पैसे याच गोष्टीचे घेतो. रतिकांतकडून प्रथमच तो आपल्यासाठी निश्चित पैशाची व्यवस्था करवून घेतो. बुद्धिमान आणि संभाषणचतुर असल्यामुळे आणि सौदेबाजी करण्यात पटाईत असल्यामुळे प्रत्येक वेळी तो पैसे कमावण्याची एकही संधी सोडत नाही.

रतिकांतच्या स्वभावातील उणिवा पाहून आणि त्याची कमतरता जाणून घेऊन त्याचा फायदा उठवत कन्येच्या रूप व गुणांचे वर्णन करत तो त्याच्याकडून पैसे उकळत राहतो. कन्येच्या पित्याचे कर्ज फेडण्यासाठी, विवाहाची तयारी करण्यासाठी तिचे दागिने कपडे, खरेदी करण्यासाठी तो सतत पैशाची मागणी करत असतो.

आपले म्हणणे दुसऱ्याला पटवून देण्यात आणि दुसऱ्याकडून स्वतःच्या मनासारखे करून घेण्यात तो वाकबगार आहे.

जसा तो स्वार्थी, धूर्त लोभी आहे तसाच तो परोपकारीही आहे. रतिकांतकडून पैसे घेताना तो त्याला हे जाणवूही देत नाही की तो त्याला मूर्ख .बनवत आहे. त्याची योजना काय आहे हे तो शेवटपर्यंत सांगत नाही आणि उघडही करत नाही यावरून त्याचा दूरदर्शीपणा दिसून येतो. एका लोभी धनवान वृद्धाकडून पैसे घेऊन एका गरजू वधूपित्याचे कर्ज फेडून तो त्याच्या कन्येचा विवाह एका अनुरूप युवकाबरोबर करून देतो यावरून त्याचा परोपकारी स्वभाव दिसून येतो.

समाजातील धूर्त, लोभी तरीही परोपकारी आणि लंपट स्वभावाच्या व्यक्तींना त्यांचे योग्य स्थान दर्शवणारी ही घटक ही व्यक्तिरेखा अतिशय उत्कृष्टपणे लेखकाने आपल्या लेखणीद्वारे साकारली आहे.

या व्यक्तीसाठी रतिकांत शेवटी म्हणतो

घटको घोटकश्चैव स्यान्मनोरथ चालक ः।

क्वचित् सन्निधिमासाद्य पदाघात प्रियःपुनः॥ [८]

**क्षीब (रामनाम दातव्य चिकित्सालयम्)** :-

क्षीब हे प्रहसनातील प्रमुख पात्र असून ती एक वेडसर व्यक्ती आहे. त्याने त्याच्याकडे येणाऱ्या प्रत्येक रोगी माणसाला रामनाम घ्यावे असे सांगितले आहे. या सोबतच तो प्रत्येक व्यक्तीच्या प्रकृतीनुसार आणि रोगानुसार त्या त्या व्यक्तीला योग्य असे पथ्य, औषधे आणि आहार यांचाही सल्ला देत आहे.

या प्रहसनात क्षीबाविषयी सूत्रधाराने असे म्हटले आहे की

तुलसीभिः कृता रामोऽविरामं रामनामकृत् ।

लोकदृष्टया भवन् क्षीबो जीवक्षेमाय वर्तते ॥ [९]

तो दम्याच्या रोग्याला साधे, पचनाला हलके जेवण, घरी तुळशी लावून नित्य तेथे रहा व रामनाम घ्या असे सांगतो तर क्षय रोग्याला जड अन्न टाळा, कांदा लसूण, मांस खाऊ नका अणि थुंकी पुरून टाका असा सल्ला देतो.

त्याच्या या कथनावरुन असे लक्षात येते की त्याने प्राकृतिक चिकित्सेचाही व्यवस्थित अभ्यास केलेला आहे. त्यामुळे त्याला प्रत्येक रोगावरील उपायही माहीत आहे.

प्रत्येक रोगावरील पथ्य - अपथ्य याचीही माहिती त्याला आहे. समाजातील विक्षिप्त वाटणाऱ्या दुर्लक्षिल्या गेलेल्या परंतु समाजाला उपयोगी पडणाऱ्या, समाजहिताचे काम करणाऱ्या व्यक्तींचे चित्रण क्षीब या व्यक्तिरेखेद्वारे केले गेले आहे असे वाटते.

**घटङ्कर (चौरचातुरियम्) :-**

या प्रहसनातील चोर (घटङ्कर) हे प्रमुख पात्र आहे. चोऱ्या करत असताना विविध युक्त्या करून, कल्पना लढवून तो सतत स्वतःला पोलिसांपासून वाचवत असतो. हे करत असताना स्वतःच्या हुशारीच्या बढायाही मारत असतो. कधी वेडयाचे, कधी आंधळेपणाचे तर कधी संधी साधून पळून जाण्यात त्याचे प्रसंगानुरुप कौशल्य दिसून येते.

त्याचे जीवनविषयक स्वतःचे असे तत्त्वज्ञान आहे त्याचे असे म्हणणे आहे की, सर्व प्राणी जसे मांजर, उंदीर, कावळा, हे चोरी करूनच पोट भरतात. म्हणून चोरी ही एक कला आहे.

अहो स्वल्पोपकरणेयं वृत्तिः....... सर्वसुलभेयंस्तेयकला । [१०]

मग मनुष्याला चोरी करणे हे पाप कसे ठरू शकते.

स्तेयं हि स्वभावधर्मो जीवानाम् ........। [११]

एका साधूच्या सिद्धीमुळे प्रभावित होऊन तो त्याचे शिष्यत्व पत्करतो. यावरुन त्याची माणसे पारखण्याची क्षमताही सिद्ध होते. त्या साधूचा शिष्य म्हणून असलेले त्याचे व्यक्तिमत्व खूपच प्रभावी आहे. राजाचा घोडा चोरण्याचे त्याचे कौशल्य पाहून नगरपालही त्याची प्रशंसा करतो.

अहो सिद्धचौरस्य चातुरी । इदानीमक्षतसम्मानःसाधयामि । [१२]

त्याही वेळी साधूला दिलेले सत्य बोलण्याचे वचन लक्षात ठेवून चोरी केल्याचे कबूल करतो.

साधूने गुरूदक्षिणा मागितल्यावर तो प्राणत्याग करण्यासाठीही तयार होतो. या प्रहसनातून चांगल्या व्यक्तीच्या सहवासामुळे वाईट व्यक्तीही चांगल्या होऊ शकतात असा संदेश मिळतो.

**रूष्यनायक (स्टॅलिन) (चण्डताण्डवम् ):-**

रूष्यनायक ही चण्डताण्डवम् या प्रहसनातील एक प्रमुख व्यक्तिरेखा आहे. रशियातील एक नेता स्टॅलिन याच्यावर हे पात्र आधारित आहे. रशियातील मार्क्सवादी विचारधारेचा हा नेता आहे. या विचारधारेत धर्म, अध्यात्म यांना कोठेही स्थान नाही. भौतिक सुखांना सर्वस्व मानणारी ही विचारसरणी आहे.

रूष्यनायकाच्या मते धर्मामुळेच जगाला विनाशात्मक प्रवृत्ती दिली गेली आहे.

धर्मो नाम कुकल्पनाल्पधिषण प्राणान्तकृद् भीषणो ,

यन्त्रं किंच पुरोधसां द्रविणदं दीनार्थविद्राविणाम् ।

दौर्बल्यं भजतानलीकशरणं द्वन्द्वैककन्दं नृणां

स्त्रीणां मानसमोहनः स हि कथं नोत्सार्यतामादृशैः ।। [१३]

त्याने स्वतःच्या आदर्शाप्रमाणे वागण्याचा सल्लाही दिला आहे. तसेच सेनापतीला सर्व धर्मवाद्यांना संपवून टाकण्याचे आदेश दिले आहेत. त्याचे असेही म्हणणे आहे की सृष्टीच्या सुरूवातीपासून धर्माचे आचरण करणारी कोणतीही व्यक्ती कधी सुखी राहू शकलेली नाही.

"हंहोधर्मधनाः। आ सृष्टेरथ यावद्धर्मसेवया पृथ्वीतले क्वापि सुखशशाङ्कोदयो दृष्टः। " [१४]

त्याचा साम्राज्यवादालाही कट्टर विरोध आहे.

परंतु त्याचा हा आदर्शवाद त्याच्या उपदेशापर्यंतच सीमित राहिलेला दिसून येतो. सर्वांना समान लेखणे तर दूरच परंतु स्वतःला सर्वश्रेष्ठ बनविण्याची त्याची आंतरिक महत्त्वाकांक्षा दिसून येते. त्याच्या वरचढ दुसरा कोणी नसावा अशी त्याची इच्छा आहे. त्याला त्याच्या सेनापतीच्या बुद्धिचापल्याबद्दलही आकस आहे. तो त्याला सर्वश्रेष्ठ बनवण्यातील अडथळा आहे असे त्याला वाटत आहे.

अहो नैपुण्यं वैचक्षण्यञ्च मित्रस्य ? देहि ते करपद्मम् ।

(स्वगतं) अहो माद्दशादप्यस्य मनीषातिशयः कथमापि न सोढव्यः।

यदि कदाचिन्मंम नायकत्वमाच्छिन्द्यात् । [१५]

ज्या व्यक्ती जीवनात स्वतःशिवाय अन्य कोणालाही महत्त्व देत नाहीत समाजातील अशा व्यक्तींचे चित्रण करण्यात आले आहे .

**धर्मपुरुष (चण्डताण्डवम्) :-**

चण्डताण्डवम् या प्रहसनातील धर्मपुरुष हे पात्र प्राचीन संस्कृती आध्यात्मिकता, धार्मिक सद्भाव यांचे प्रतीक आहे. शांती, अहिंसा इ. गुणांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या भारत देशातील ही व्यक्तिरेखा आहे. ज्याप्रमाणे सुगंध हा फुलाचाच एक भाग आहे. प्राण हा शरीराचा एक भाग आहे. उष्णता हा अग्नीचा एक भाग आहे तसा धर्म हा देशाचा एक भाग आहे असे धर्मपुरुषाचे म्हणणे आहे.

आकर्ष देहात् पवनं कृशनोरोष्ण्यं तरोरान्तरभानुरश्मिम् ।

सौगन्धिकाद् गन्धलवञ्च वन्द्यो । धर्मस्य राष्ट्रात् कुरु संविभागम् । [१६]

सहिष्णुतेमुळे राष्ट्रनिर्मिती होते. धर्माला राष्ट्रापासून वेगळे केले जाऊ शकत नाही. धर्महीन नीती म्हणजे स्वरहीन वाद्य.

धर्महीना नीतिरपि स्वरहीना गीतिरिव विफला । [१७]

त्याचे असे मत आहे की

न खलु सम्भवति धर्मविना राष्ट्रनिर्माणम् । [१८]

त्याने रूष्यनायकालाही हे समजविण्याचा प्रयत्न केला आहे की, धर्माचे महत्त्व न समजता तू धर्माचा विनाश करू पाहत आहेस त्यामुळे तू आत्मविनाशालाच निमंत्रण देत आहेत.

लोभ, क्रोध, हिंसा, पाप ही दुष्टभावनेची प्रतिके जेव्हा भारतात प्रवेश करू पाहतात तेव्हा धर्म आणि अहिंसेच्या शक्तीपुढे, त्यांच्या तेजापुढे ते शक्तिहीन होतात. भारतात प्रवेश करताना त्यांना भीती वाटू लागते धर्मपुरुषपुढे टिकाव न लागता त्याच्या शरीरातील तेजज्योतीमुळे त्या दुष्ट शक्ती पळून जातात.

धर्मपुरुषाच्या माध्यमातून लेखकाने भारतातील आध्यात्मिकता, प्राचीन संस्कृती, भारतीय विचारधारा यांचे प्रभावी चित्रण केले आहे. या प्रहसनातून भारतीय आणि पाश्चात्य यांच्या विचारसरणीतील फरक दर्शवला गेला आहे.

भारतीय व पाश्चात्य शैलीतील नाटकांचे मिश्रण यातून दाखवले गेले आहे. शृंगारिकता आणि अश्लीलता यांच्यातून बाहेर पडून प्रहसनांची योजना विश्वकल्याणासाठी केली जाऊ शकते हा विचार या प्रहसनातून व्यक्त होतो. हा विचार नव्या विचारांचे द्योतक आहे.

**नव्यत्रय (स्वातंत्र्यसंधिक्षणम्)** :-

स्वातन्त्र्यसंधिक्षणम् या श्री. जीवन्यायतीर्थ यांच्या प्रहसनातील नव्यत्रय हे नायक आहेत. धनेश, गणेश आणि रणेश या तिघांना भारतीय आधुनिक विचारधारेचे प्रतिनिधी म्हटले आहे. त्यांना जुनी भारतीय संस्कृती माहीतही नाही. अन्य देशातील प्रगती, तंत्रज्ञान, तेथील संस्कृती यांची त्यांना जाणीव आहे. परंतु प्राचीन भारतीय संस्कृतीचा त्यांना गंधही नाही.

त्यांच्यामते रामायण हे कविकल्पित रूपक आहे. ज्यामधे अविकसित दक्षिण क्षेत्राचा तेथील शेतीचा विकास करण्यासाठी राम आले होते.

सीता लाङ्गलपद्धति हलधरो रामः पुरा वर्वर क्षेत्रे दक्षिणनीवृति प्रहितवान् आधातुकामः कृषिम् । तां रुन्धन दशकन्धरोऽस्थिरमतिर्मृत्यो-विधेयोऽभवद । धन्यं रूपककल्पनं कविकृतावेतद्धि रामायणम् ॥ [१९]

आणि विकासाला विरोध करणाऱ्या रावणाचा रामाने वध केला. या नव्यत्रयाला महाभारत हे ही द्यूत मद्यपान इ. व्यसने, स्त्रियांवरील अत्याचार इ. रोचक कथांची मालिकाच वाटते.

द्यूतादिव्यसनं वधूवसनकेषाकर्षण संसदि
स्त्रीणां पञ्चपतिप्रसङ्गकरणं कन्यासुतोत्पादनम् ।
ज्ञातीनां हननं कुचक्रिचरणद्वन्द्व च चित्तार्पणम्
व्यासोपाधिकभूरिसूरिवचनं ज्ञेयं महाभारतम् ॥ [२०]

त्यांचे जीवनविषयक तत्त्वज्ञानही आहे. प्राण ,सर्व इंद्रिये ही पोटाशी संबंधित आहेत. म्हणून पोट हे त्यांच्यामते ब्रह्मस्वरूप आहे. प्राच्यसंस्कृतीत ज्याला उन्मत्तपणा असे म्हटले जाते त्याला ते स्वतंत्रता मानतात. पूर्वापार चालत आलेल्या सर्व बंधनांपासून मुक्ती म्हणजे स्वैराचार यालाच ते स्वतंत्रतेचे लक्षण मानतात.

उदरं वै ब्रह्म ......... मनश्च । [२१]

जरी त्यांची अशी मानसिकता आहे तरी भारतासाठी त्यांच्या मनात अपार सहानुभूती आहे. त्यांना भारत अखंड हवा आहे. कोणत्याही प्रकारे त्याचे विभाजन होणे नव्यत्रयांना मान्य नाही. माहम्मदच्या स्वतंत्र पाकिस्तानाच्या मागणीने व्यथित होऊन त्याला समजाविण्याचा प्रयत्न करतात.

भो माहम्मद । परित्यज्यतां पाकिस्थानचिन्ता । आगच्छ मिलित्वैव वयं भारतमातुः स्वातन्त्र्यं रचयामः। [२२]

पण शेवटी विवश होऊन खंडित स्वतंत्रता मान्य करावी लागते.

त्या तिघांचा भगिनी प्राच्य संस्कृती (प्रतिकात्मक मुख्य स्त्री पात्र) ,अखंडतेचे पुजारी यतिवर्य यांच्याशी असणारा व्यवहार अपमानास्पद व निंदनीय आहे. तर दुसरीकडे भारताच्या विभाजनाचे कारण असणाऱ्या इंग्रजांविषयी त्यांना अतिशय अभिमान आहे. स्वतःच्या विचारसरणीनुसार ते स्वतःची बहीण आणि यतिवर्य यांना तुरुंगातही पाठवतात.

आधुनिक भारतीयांच्या मानसिकतेचे दर्शन घडवणाऱ्या या व्यक्तिरेखा आहेत. आपली संस्कृती विसरुन सभ्यतेच्या नावाखाली परकीय संस्कृतीचा अंगिकार करण्यातच ते धन्यता मानतात.

**माहम्मद (स्वातंत्र्यसन्धिक्षणम्) :-**

प्रहसनातील सर्वाधिक क्रियाशील असलेले हे पात्र मुस्लिम संस्कृतीचा प्रतिनिधी आहे. तो स्वभावाने हट्टी, उग्र, निर्दयी आणि हिंसा, सांप्रदायिकता जातपात यावर विश्वास असणारा असा आहे. देशाचे विभाजन कोणत्याही परिस्थितीत करून पाकिस्तान बनवला जावा याबद्दल तो आग्रही आहे.

पाकिस्थानस्थापनं नः प्रतिज्ञा, उष्णैः शोणितैर्जयामः।

युद्धमाना ननु तावद्वयं न भीताः सम्पादयितुं सर्वथा इष्टकार्यम् ॥ [२३]

भारताला अखंड स्वातंत्र्य मिळविण्यात तो सगळयात मोठा अडथळा आहे. नव्यत्रयांना माहम्मद पाकिस्तान झालाच पाहिजे असे सांगतो आणि असे जर होणार नसेल तर त्याची युद्धाचीही तयारी आहे. त्यासाठी सुरा उपसून तो त्यांना धमकाविण्याचाही प्रयत्न करतो. त्याच्या हट्टी व आततायी स्वभावाचे हे सूचक आहे.

ममैकं वचनं पाकिस्तानं तदङ्गीकुरुत अन्यथा स्वातन्त्र्यं विघटितं भवतु । [२४]

आपल्या भारतमातेला तुकडे होताना पाहूनही त्याचे हृदय द्रवत नाही. त्याला असेही वाटत नाही की अखंड भारतमाता राहू दे. तिच्या तुकडयावरच त्याचे प्रेम आहे. मातेच्या विव्हल उद्‌गारांचाही त्याच्यावर काही परिणाम होत नाही.

प्राच्यसंस्कृतीशी असलेला त्याचा व्यवहारही निंदास्पद आहे. त्याला समजावण्यासाठी तिने सांगितलेल्या समजुतीच्या गोष्टीही त्याचा राग अनावर करतात आणि तो तिला दंड देण्याची धमकीही देतो.

किं कथमसि धृष्टे महिले । वयं धर्मान्तरीकृता दासाः ?

ईदृशस्य दुर्वचनस्य उचितं दण्डं ते दास्यामः। [२५]

समाजातील वाईट प्रवृत्ती आणि वाटेल त्या परिस्थितीत स्वतःचे खरे करणाऱ्या, आपल्या हितापुढे पूर्ण समाजाचाही विचार न करणाऱ्या व्यक्तींचे ही व्यक्तिरेखा प्रतीक आहे. पाकिस्तानची मागणी करताना आणि अखंड भारताचे तुकडे करणाऱ्या तत्कालीन मुस्लीम प्रतिनिधींचे माहम्मद ही व्यक्तिरेखा प्रतिनिधित्व करते.

**राजा (रागविरागम्) :-**

राजा हे पात्र रागविरागम् या प्रहसनाचा नायक आहे. आपल्या राज्यात गायन-वादन इ. कलांवर खर्च करणे म्हणजे पैशाचा अपव्यय करणे होय असे मानणाऱ्या अरसिक शासकांचा तो प्रतिनिधी आहे. त्याने अशी आज्ञा दिलेली आहे की

राज्यात कोणीही गायन-वादन करता कामा नये. जर कोणी या आज्ञेचे उल्लंघन करेल तर वाद्ये इत्यादी सामग्री नष्ट करून त्या व्यक्तीला नगराच्या बाहेर घालवण्यात यावे.

द्वारी - न जानासि स्वामिनोऽस्माकं निर्देशम् । यः कोऽपि रागवितानं दर्शायिष्यति स गलहस्तितो ध्वस्तवाद्ययन्त्रो नगराद् बहिष्कर्तव्य इति । [२६]

या विलासांमुळेच राज्य पराभूत होते असे त्याचे म्हणणे आहे.

राजाच्या आज्ञेचे उल्लंघन करूनही काही रसिक गुपचूपपणे आपले मनोरंजन करुन घेत आहेत. अशापैकीच एक पकडला गेल्यानंतर राजाविरोधी आपले मत मांडतो.

संगीतरस - विद्वेषी राजा भवति राक्षसः।

तद्वधाय यतिष्येऽहं छलेन च बलेन च ॥ [२७]

राजाला धन आणि सेना यांचे विशेष आकर्षण आहे. सेनेची शक्ती आणि संपत्ती हीच खरी राज्याची संपत्ती आहे असे त्याचे मत आहे. त्याच्या राज्यात सेनेत मुक्त प्रवेश आहे. सेनेत भरती होऊन कित्येक युवक फुकट जीवन जगत आहेत.

राजसन्तोषाय प्रत्यह बहवो युवानः सेनापदमङ्गीकृत्य जीविकासमाधानं कुर्वन्ति, विनायासं भोजनशय्यापरिच्छदाँश्च लभन्ते । [२८]

एकूणच राजाचे व्यक्तिमत्व अरसिक, उग्र व विवेकशून्य आहे. त्याने मंगलप्रसंगी वाजवल्या जाणाऱ्या वाद्यांवरही प्रतिबंध घातला आहे. एका तरूण दांपत्याला तो राजसभेत गायची परवानगी देतो परंतु त्यांना कोणीही बक्षीस देऊ नये अशी आज्ञा करतो.

त्या तरूण दांपत्याच्या गायनाने राजकुमारीचा पळून जाण्याचा बेत रद्द होतो. राजकुमार राजाच्या हत्येच्या कटाची योजना रद्द करतो. एका साधूचा संसार मार्गाकडे झुकण्याचा निर्णयही बदलतो. या सर्व गोष्टीमुळे राजाचे डोळे उघडतात आणि प्रत्येक कलेचे महत्व त्याला समजते.

सत्यं संगीतमहिमा मां मोहयति । संगीतेनैवाद्य मे जीवनधनमानश्च रक्षिताः। [२९]

आपली कर्तव्येही न जाणणारा आणि उचित गोष्टींना महत्त्व न देता अनाठायी द्रव्यापव्यय करणारा राजा हा समाजातील अरसिक, असहिष्णू व विवेकहीन अशा व्यक्तींचे प्रतीक आहे . परंतु राजाला हे ही शेवटी समजते की संपत्तीच्या मापात प्रत्येक गोष्टीची पारख होत नाही.

**वक्रेश्वर शर्मा (दरिद्रदुर्दैवम्) :-**

विप्र वक्रेश्वर शर्मा दरिद्रदुर्दैवम् या प्रहसनाचा नायक आहे. तो एक अतिशय दरिद्री भिक्षुक आहे हे त्याच्या प्रवेशावेळच्या अवस्थेवरुन स्पष्ट होते. फाटकी वस्त्रे, तुटकी छत्री, जीर्ण झालेली पादत्राणे यावरुन त्याची दुर्दशा स्पष्ट होते.

छिन्नं छत्रं छिन्ने पादुके, भूतलं ज्वलदग्नितुल्यं चरणो मे निपीडयति । [३०]

आपल्या पत्नी आणि मुलांचे पोट भरण्यापुरतेही अन्न त्याला दिवसभर वणवण केल्यानंतर मिळत नाही. त्याला याचे कारण म्हणजे पाषाणहृदयी धनाढय कृपण सावकार हेच वाटतात.

त्याच्या स्वभावात अनेक उणिवा, कमतरता आहेत त्यातील अनेकांना परिस्थिती जबाबदार आहे तर काहींना तो स्वत: परिस्थितीमुळे तो रूक्ष, स्वार्थी आणि कोत्या मनोवृत्तीचा बनलेला आहे. भिक्षा मागून मिळालेल्या तांदळाचा काही भाग तो मुलांची, पत्नीची पर्वा न करता स्वत:साठी बाजूला ठेवतो. यावरून त्याची स्वार्थी मनोवृत्ती स्पष्ट होते.

तो आपल्या गृहकर्तव्यापासून पराङ्मुख आहे. त्याला आपल्या दारिद्रयाचे कारण आपल्या कर्तव्याचा अभाव न वाटता आपली पत्नी वाटते. आपल्या कर्तव्यदक्ष पत्नीलाही तो सतत टोमणे मारत आहे.

स्त्रीभाग्येन भवेत्लक्ष्मीः पत्युरित्युच्यते जनैः।
अहो त्वदभाग्ययोगेन दुर्भिक्षं न जहाति माम् ॥ [३१]

पत्नीशी झालेल्या थोड्या वादावादीमुळे तो त्यांना असहाय्य सोडून जायला निघतो. जेव्हा त्याला जाणवते की हे अशक्य आहे तेव्हा आपल्या कठोर हृदयानुसार

त्यांनाही ओढत भिक्षाटनासाठी नेतो. आपल्या तहानेने व्याकुळ मुलांना पाहून तो सहजपणे म्हणतो की असा त्रास आपल्याला रोजच सोसावा लागतो.

साम्प्रतं भिक्षाटनक्लेशः स्वयमनुभूयताम् । एवंविधः क्लेशः प्रतिदिनं मया सोढः सह्यते च । [३२]

प्रसंगी गोड बोलून आपल्या चुकांवर पांघरूण घालण्यासाठी तो पटाईत आहे. तांदळाची चोरी पकडली गेल्यानंतर तो पत्नीचीही खुशामत करतो. जेव्हा सिद्ध पाणी देऊन त्याच्या मुलाचे प्राण वाचवतो तेव्हा आपली दुर्दशा संपवावी यासाठी त्याची प्रार्थना करतो.

त्याच्या स्वभावात विवेकशून्यता, ईर्ष्या, द्वेष हेही अवगुण आहेत. शिव पाशकामुळे जेव्हा त्याचे दारिद्र्य दूर होते पण शेजाऱ्यांना त्याच्यापेक्षा दुप्पट मिळते तेव्हा तो ईर्ष्येने पेटून उठतो. त्याचे असे म्हणणे आहे की एकवेळ मी दरिद्री राहिलो तरी चालेल पण बाकीच्यांना उत्कर्ष मला सहन होत नाही.

अन्धः कुष्ठी दरिद्रो वा प्रतिवेशी वरं भवेत् ।
समानधनगर्वेण स्पर्धमानो हि दुःसहः॥ [३३]

यामुळे शिव पाशकासारखी वस्तू तो हरवून बसतो व दरिद्रीच राहतो.

वक्रेश्वर शर्मा या पात्राद्वारे समाजातील स्वतःच्या अपयशाचे खापर दुसऱ्यावर फोडणाऱ्या आणि संकुचित मनोवृत्तीमुळे हातातील संधीही गमावून बसणाऱ्या व्यक्तींचे चित्रण करण्यात आले आहे

**रंगनाथ (क्षुतक्षेमीयम्) :-**

रंगनाथ ही क्षुतक्षेमीयम् या प्रहसनातील मुख्य व्यक्तिरेखा आहे. स्वर्गातील चित्रगुप्तालाही हेवा वाटावा अशी त्याची संपन्नता आहे. त्याचा भव्य प्रासाद व ऐश्वर्य पाहून चित्रगुप्त आश्चर्यचकित होतो.

सुखसुविधांसाठी घरी नोकर चाकर ही आहेत परंतु अतिशय कंजूष असलेला रंगनाथ घरी मुंगीही शिरू देत नाही.

अत्रपिपीलिका प्रवेशोऽपि नास्ति । [३४]

नोकरचाकरांनाही अतिशय कमी पगार देऊन भरपूर राबवून घेतो आणि जरा चूक झालेली ही त्याला सहन होत नाही. कंजुषपणामुळे त्याच्याठायी दया, त्याग यांचा लवलेशही नाही. दारात आलेली माणसेच नव्हे तर कुत्रीही दमून परत जातात पण त्यांच्या मुखात काही पडत नाही.

कुक्कुरोऽपि तावदितो रोदनं कृत्वा प्रतिनिवर्त्तते । [३५]

अशा कृपण रंगनाथाला घरात आलेला अतिथी म्हणजे संकटच वाटते. अशा कृपण रंगनाथाकडे चित्रगुप्त पाहुणा म्हणून जातो आणि रंगनाथ त्याला ही धर्मशाळा नाही असे म्हणून बाहेर काढू पाहतो परंतु चित्रगुप्ताने आपण गुप्त धन कोठे आहे हे सांगतो असे म्हटल्यावर धनाच्या लालसेपोटी रंगनाथ त्याची सेवा करण्यास तयार होतो. धनलालसेसोबतच त्याला हेही समजते की असे धन मिळणाऱ्याचे आयुष्य कमी असते. या माहितीमुळे तो चिंतीत होतो.

श्रूयते निधिलाभो भवति प्रायो हीनायुष्काणाम् । कथ्यतां मदीय आयुष्यपरिमाणम् भोगादृश्टाच कीदृशम् । [३६]

अतिशय प्रयत्नांनी तो त्याच्याकडून आपले आयुष्य जाणून घेण्यात यशस्वी होतो पण केवळ एकच वर्ष आयुष्य शिल्लक राहिले आहे हे जाणून तो मूर्च्छित होतो.

चित्रगुप्तालाच तो आपल्या दीर्घायुष्यासाठी उपाय विचारतो. गरीबांना घरे शाकारून देण्याचा उपाय चित्रगुप्ताकडून समजताच त्याला तो फारच महागडा उपाय वाटतो.

वर्ष व्याप्य त्वं द्ररिद्राणामुटजोपरि तृणाच्छादनं मुक्तहस्तो देहि । [३७]

यावरून जीवापेक्षा जास्त धन जपण्याची त्याची वृत्ती दिसून येते.

एतावती भोगसामग्री, इयान् विभवः निधिसमागमाशा, सत्यपि सर्वेषु उपकरणेषु न शक्नोम्यहं पुनर्जीवितुम् । [३८]

यमलोकात गेल्यावरही चित्रगुप्त आणि यमाकडून रंगनाथ आपले आयुष्य वाढवून घेण्यात यशस्वी ठरतो.

या व्यक्तिरेखेवरुन लेखकाने समाजातील अल्प श्रमात जास्त मोबदला मिळवू इच्छिणाऱ्या आणि दुसऱ्या व्यक्तीच्या श्रमाची कदर न करता धनाला सर्वस्व मानणाऱ्या अशा व्यक्तींचे चित्रण केले आहे .

**कपाली (चिपीटक चर्वणम्) :-**

चिपीटक चर्वणम् या प्रहसनाचा नायक असलेला कपाली हा अतिशय कंजूष माणूस आहे. घरातील दासीने वापरण्यास अयोग्य म्हणून फेकून दिलेली मोडकी छत्री देखील तो पुन्हा घरी आणतो. नोकराने फेकून दिलेल्या जुन्या चपला पाहून तो नोकरावर संतापतो आणि कुत्र्याने त्या तोंडात धरुन पळून जाताना पाहून तो कुत्र्यापाठीमागे पळत सुटतो.

छत्री आणि चप्पल गेलेल्या पाहून तो जेवढा दुःखी होतो तेवढा तो कुत्र्याने घेतलेल्या चाव्यामुळे रक्तबंबाळ झाल्यानेही होत नाही. पैशाच्या अतिमोहामुळे तो साठवलेला पैसा अजिबात खर्च न करता प्राणापलिकडे जपतो आहे. पैसे जातील या चिंतेने श्वानदंशावर इलाज करण्यासाठी तो वैद्य बोलावण्यासाठीही तयार नाही.

कथं वा वैद्य आहूतः ? दर्शनीं को दास्यति ? [३९]

आलेल्या वैद्यालाही तो श्वानदंशाने पिसाळल्याचा अभिनय करुन व त्याला चावण्यासाठी अंगावर ,धावून जाण्याचे नाटक करून पळवून लावतो.

इलाजासाठी आलेल्या तांत्रिकालाही तो इलाज करायला तेव्हाच परवानगी देतो जेव्हा तो शुल्क म्हणून अधिक पैसे घेणार नाही असे कबूल करतो. तांत्रिक जेव्हा इलाज करताना घरातील सर्वांनी तीन महिने फक्त चिवडा खाऊन रहावे असे सांगतो तेव्हा त्याला पैसे वाचल्याचा अधिकच आनंद होतो. आपल्या नोकरांवरही तो अतिशय आरडाओरडा करतो. पत्नीलाही तो योग्यपणे वागवत नाही. त्याच्या पत्नीने रंगिणीने त्याच्याबद्दल काढलेले उद्गार तिच्या त्याच्याबद्दलच्या भावना दर्शवतात.

नमोऽस्तु पतिदेवाय ब्रह्मविष्णुस्वरूपिणे ।
चतुर्मुखोऽसि कलहे ताडनेच चतुर्भुजः ॥ [४०]

तांत्रिक मात्र गोड बोलून त्याचा विश्वास संपादन करतो आणि त्याच्या इलाजासाठी स्थापन केलेल्या कलशात सोने ठेवायला सांगतो आणि जेवढे ठेवाल त्यापेक्षा खूप जास्त परत मिळेल अशी खात्री देतो.

अङ्क शून्ययुतो ग्राहय: स्वर्णत्रैगुण्यकर्मणि ।

शून्यहीनो यदा ह्य्ङ्कः शक्य सर्वलयस्तदा ॥ [४१]

यामुळे कपाली १० तोळे सोने टाकतो आणि तांत्रिक त्याला झोप येणारे चूर्ण खायला घालून झोपवतो. कपालीला तांत्रिक असे सांगतो की नोकराच्या शिवण्यामुळे सोने पाण्यात विरघळले.

तव दासेन पादुकारोपणेन पूजाद्रव्यं सर्व विनाशितम् ।

सुवर्णमपि द्रवीभूतम् । [४२]

ते सोने तांत्रिकाकडून शेजाऱ्यांकडे व शेजाऱ्यांकडून कपालीची पत्नी रंगिणीला मिळते.

या पात्राद्वारे लेखकाने समाजातील कवडीचुंबक आहेत तरी समाजातील आपल्या प्रतिष्ठेला जपणारे आहेत अशा व्यक्तींचे चित्रण केले आहे आणि अशा व्यक्तींना फसवणारे समाजात शेरास सव्वाशेरही आहेत.

**हलधर - जलधर (योग्य युगल मेलनम्) :-**

योग्य युगल मेलनम् या प्रहसनाचे हलधर-जलधर हे दोन नायक आहेत. हलधर श्रीकृष्णाचा तर जलधर हा राधेचा परमभक्त आहे. दोघांनाही आपलेच उपास्य दैवत श्रेष्ठ वाटत आहे. त्यामुळे आपापल्या दैवताचे गुणगान करत दोघेही वादविवादात गुंतले आहेत. तर्काद्वारे आपल्या वादाचा निर्णय लागत नाही असे जाणवल्यानंतर दोघेही शारीरिक बलाद्वारे वादाचा निर्णय करू इच्छितात.

या मल्लयुद्धाचा कोणताही निश्चित निर्णय होण्याआधीच हलधर आणि जलधर यांच्यात राधा व गोविंद हे दाम्पत्य आडवे येते. जलधर हा जाडजूड व तगडा आहे. तो हलधर याला डोईजड होत असतानाच हे दांपत्य मधे पडल्यामुळे हलधर हरण्यातून वाचतो आणि त्याचे प्राणरक्षणही होते यामुळे नकळतच तो दांपत्यातील राधेचा जयजयकार करतो आणि हलधराने असे केल्याने जलधर त्याला

अलिंगन देतो अशाप्रकारे त्यांच्यातील वाद मिटल्याने आणि दोघांनाही आपल्या उपास्य दैवतातील अभेद स्पष्ट झाल्यामुळे दोघेही आनंदी होतात.

या प्रहसनातील व्यक्तिचित्रणातून लेखकाने समाजातील सांप्रदायिक आणि धार्मिक मुद्दयांवरून वितंडवाद घालणाऱ्या व्यक्तींचे चित्रण केले आहे. अशा सर्व मतभेदांना संपवून समाजात एकता निर्माण करण्यासाठी झटले पाहिजे असे या व्यक्तिचित्रणाद्वारे दर्शवले गेले आहे.

**ब्राह्मण (भट्टसंकटम्) :-**

ब्राह्मण हे भट्टसंकटम् या प्रहसनातील प्रमुख पात्र आहे. यज्ञकर्मात कुशल असलेला एक साधक तपस्वी ब्राह्मण आहे. आलेल्या सर्व संकटांचा विनाश करण्यात तो तत्पर आहे हे त्याने त्याच्या नोकराला राक्षसभयातून मुक्त केले यावरुन दिसून येते परंतु असा हा ब्राह्मण त्याच्या कुरूप आणि कजाग पत्नीच्या त्रासाने अतिशय व्यथित झालेला आहे.

यज्ञकर्म करीत असल्याने त्याला प्रत्येक कामात पत्नीची अतिशय आवश्यकता आहे परंतु ती मात्र त्याचे मुखदर्शनही अशुभ मानते. त्याच्याबद्दल तिच्या मनात तिळमात्रही आदर नाही हे माहीत असूनही यज्ञकर्मासाठी तिची हांजीहांजी करणे त्याला भाग पडत आहे. त्याला असे करणे आवश्यक आहे कारण राक्षसांच्या विनाशासाठी त्याने जो यज्ञ आरंभ केला आहे त्याच्या सिद्धीसाठी हे करणे क्रमप्राप्त आहे.

त्याच्या यज्ञामुळे राक्षस खवळून त्याच्या पत्नीला पळवून नेतात परंतु राजाच्या सांगण्यावरूनही तो दुसरे लग्न करण्यास किंवा सुवर्ण प्रतिमा बनवून यज्ञसिद्धी करण्यास तयार होत नाही. याचे कारण म्हणजे त्याचे आपल्या पत्नीवर निरतिशय प्रेम आहे. तिच्यावरील प्रेमामुळे एका सिद्ध पुरुषाद्वारे तिचा ठावठिकाणा त्याला समजतो. राक्षसांनी बंदी म्हणून ठेवून घेतलेल्या आपल्या पत्नीची तो राजसेनेच्या मदतीने सुटका करतोच शिवाय राक्षसांच्या त्रासातूनही मुक्तता होते आणि राक्षसांच्या मदतीने आपल्या पत्नीची कुरूपता ही तो संपवतो. त्याची पत्नी रूपसंपन्न होऊन त्याला परत मिळते.

या प्रहसनाद्वारे लेखकाने विदूषक, अश्लीलता यांचा आधार न घेता निखळ हसण्याने प्रहसन तयार करण्यात यश मिळवले आहे. यातील ब्राह्मण हे पात्र कोणत्याही काळातील गृहस्थाला लागू होणारे आहे जो स्वपत्नीवर प्रेम करतो आणि तिच्यावरील प्रेमापोटी कोणतेही अग्निदिव्य करू शकतो.

**सुबन्धू (पुरुषरमणीयम्)** :-

सुबन्धू हा पुरुषरमणीयम् या प्रहसनाचा नायक आहे. शिक्षण घेऊनही बेरोजगार असलेला हा युवक उपजीविकेच्या शोधात आहे. त्याला उपजीविकेसाठी कोणतेही साधन न मिळाल्यामुळे भिक्षेवर जगावे लागत आहे. त्याला मनोमन आपल्या विद्यार्जनाचा राग येतो आहे की ज्या विद्येचा उपयोग उपजीविकेसाठी होत नाहीच पण भिक्षा मागताना त्याचा अडथळाच होतो आहे. त्याच्या मते वेद, धर्म विद्या इत्यादी हे सर्व माती आणि बिनकामाची गाठोडी आहेत.ही विद्या मदत तर करीत नाही पण संकोच वाढल्याने भिक्षाटनासही त्रास होतो

उद्गिर तां .................. मदविकाराणाम् ॥ [४३]

त्याला परिश्रमाचे महत्त्वही माहीत आहे. तसेच तो बुद्धिमान, साहसी, निर्भीड व शक्तिवानही आहे. त्याला स्वतःला जे योग्य वाटते ते दुसऱ्याला पटवून देण्याची क्षमताही आहे. त्याला स्वाभिमान आणि आत्मविश्वासही आहे. त्याला हेही माहीत आहे की सुशिक्षित युवकासाठी भिक्षावृत्ती योग्य नाही. जेव्हा राजपुरुष त्याला यावरून लागेल असे बोलतो तेव्हा त्याला ते अतिशय क्लेषदायी होते भिक्षूपेक्षा चोरच श्रेष्ठ हे जेव्हा सुबंधू राजपुरुषाकडून ऐकतो तेव्हा चोर होण्याचा निश्चय करतो.

तो एक अतिशय चांगला मित्रही आहे. कारण सोमदत्त जेव्हा रूपपरिवर्तन होऊन स्त्री होतो तेव्हा या बदलाला स्वतःला जबाबदार धरून तो त्याही परिस्थितीत तिची आयुष्यभर साथ करायला तयार होतो.

त्वां परित्यज्य नाहं जीवितुमिच्छामि । [४४] हे त्याचे उद्गार त्याच्या मित्रत्वाची कसोटी आहे. शेवटी सहचारिणी म्हणून तो सोमदत्तेचा स्वीकारही करतो.

एकूणच सुबंधूचे चरित्र अतिशय उत्तम आहे. फक्त एकच उणीव त्याच्या स्वभावात जाणवते ती ही की तो आयुष्यात पैशालाच सर्वस्व मानतो. विद्येलाही उपजीविकेचे साधन मानतो. पैशाच्या लोभामुळे तो चोरीसारखे नीच कर्मही करण्यास तयार होतो.

सुबंधूचे चरित्र चित्रण करून लेखकाने समाजातील त्या सुशिक्षित बेरोजगारांचे चित्रण केले आहे. ज्यांच्यामुळे समाजातील बेरोजगारीची समस्या बिकट होत आहे. त्याची मनस्थिती आणि त्याच्या समस्या या समाजातील प्रातिनिधिक स्वरुपाच्या आहेत.

**सोमदत्त (पुरुषरमणीयम्) :-**

सोमदत्त हे पात्र पुरुषरमणीयम् या प्रहसनातील एक प्रमुख पात्र आहे. या प्रहसनाचा नायक सुबंधू याचा हा घनिष्ठ मित्र आहे. तो मित्राप्रमाणेच बेकार आहे. पुरुष असूनही त्याच्यात स्त्रीगुण जास्त प्रमाणात आहेत. सुबंधू त्याला हे म्हणूनही दाखवतो.

नारीसधर्मा हि पुमान् यथा त्वम् । [४५]

भिक्षेसाठी दोघे निघाले असताना तो स्त्रीवृत्तीने हळूहळू चालतो. त्याला सुशिक्षित असल्यामुळे भिक्षा मागणे पटत नाही. त्याला हे कृत्य शिक्षित व्यक्तीसाठी योग्य वाटत नाही.

त्याच्यामधे स्त्रीसुलभ संकोच लाज इत्यादी गुण अधिक प्रमाणात आहेत. त्याने चोर म्हणून वृत्ती स्वीकारल्यावरही वृद्धा पडल्यानंतर तो विसरून तिच्या मदतीला धावतो. सुबंधू त्याच्या या गुणांमुळेच राणी सीमांतिनीकडे जाताना त्याला स्त्रीरूपात घेऊन जातो. स्त्रीवेशात तो अतिशय सुंदर दिसत आहे. त्याच्या रूपावर सुबंधूही मोहित होतो.

स्त्रीरूपात स्वतःला पाहून आणि खरोखरच स्त्रीरूपात परिवर्तित झाल्याचे कळल्यावर त्याला आपल्या मूर्खपणाचा पश्चात्ताप होतो. अशा स्थितीत स्वजनांसमोर जाण्यापेक्षा मरणे बरे हे त्याचे उद्‌गार त्याचा स्वाभिमान दर्शवतात.परंतु शेवटी मात्र त्याला पूर्वजन्मानुसार सुबंधूची पत्नी बनून राहावे लागते.

सोमदत्त हे पात्र समाजातील बेकार सुशिक्षित युवकांचे प्रतिनिधित्व करते. हे प्रहसन लेखकाने देशकालोपयोगी असल्याचे सांगितले आहे.

**गौण पात्रे -**

या प्रमुख पात्रांशिवाय काही गौण किंवा सहाय्यक पात्रेही आहेत ज्यांचे प्रहसनामधील अस्तित्व तितकेसे परिणामकारक नाही तरीही त्यांच्या समावेशाशिवाय प्रहसनाचे कथानक पुढे जात नाही. त्यांचा समावेश गौण पात्रांमधे करण्यात आला आहे.

स्वातंत्र्यसंधिक्षणम् मधील श्वेतांग, यतिराट् ही पात्रे गौण असूनही आपल्या अस्तित्वाची छाप जनमानसावर सोडून जातात. भारतावर पारतंत्र्यात असताना राज्य करणाऱ्या समस्त इंग्रजांचे प्रतिनिधित्व करणारे **श्वेतांग** हे पात्र आहे. भारतात फाळणीची बीजे पेरणाऱ्या भारताची अखंडता खंडित करुन सामर्थ्य कमी करणाऱ्या इंग्रजांचे प्रतीक असलेले हे पात्र माहम्मदला पाकिस्तान निर्मितीसाठी उद्युक्त करते.

**यतिराट्** हे पात्रही याच प्रहसनातील असून ते समस्त स्वातंत्र्यवादी आणि प्राचीन संस्कृतीप्रेमी भारतीयांचे प्रतिनिधित्व करते. स्वतंत्र भारताच्या अखंडतेसाठी जीवनाचे बलिदान करण्यासही तयार असणाऱ्या समस्त भारतीयांचे ते प्रतीक आहे.

चौरचातुरियम् मधील **साधू** हे पात्रही महत्त्वपूर्ण आहे. ज्या चोरामुळे, घट[3]करमुळे त्याला त्रास सोसावा लागतो त्याचे जीवनविषयक दृष्टिकोन बदलून टाकण्यात ते यशस्वी होतो.

पुरुष पात्रांचेही वर्गीकरण पुढील प्रकारात करण्यात आले आहे. १) पौराणिक किंव ऐतिहासिक पात्रे, २) यथार्थवादी युगीन पात्रे ३) प्रतिकात्मक पात्रे, ४) व्यक्तिगत पात्रे ५) वर्गगत पात्रे.

१) **पौराणिक किंवा ऐतिहासिक पात्रे** - प्रहसनात जी पात्रे आपल्याला त्यांच्या पुराण किंवा इतिहासातील नावे व कामे यांच्यामुळे माहीत आहेत ती पात्रे या प्रकारात येतात. उदा. क्षुतक्षेमीयम् मधील चित्रगुप्त, यम, रागविरागम् मधील राजा.

२) **यथार्थवादी युगीन पात्रे** - यथार्थवादी युगीन पात्रांमधे प्रहसनाच्या काळानुसार, कथानकानुसार त्या त्या काळाचे प्रतिनिधित्व करणारी पात्रे समाविष्ट होतात.

उदा. विवाहविडम्बनम् मधील रतिकांत, घटक, पुरुष रमणीयम् मधील सुबंधू, स्वातंत्र्यसंधिक्षणम् मधील नव्यत्रय , माहम्मद

३) **प्रतिकात्मक पात्रे** - प्रतिकात्मक पात्रांमधे जी पात्रे प्रत्यक्षात अस्तित्वात नसतात ती पात्रे समाविष्ट होतात, ज्यांचा प्रहसनात पात्रे म्हणून उपयोग केला गेला आहे. भावना, विचारांना मूर्तरूप देऊन ही पात्रे तयार केली जातात.

उदा. स्वातंत्र्यसंधिक्षणम् मधील भारतमाता, प्राच्यसंस्कृती, यतिराट्, श्वेतांग, चण्डताण्डवम् मधील रूष्यनायक, धर्मपुरुष, पाप इत्यादी. नव्यत्रय, माहम्मद ही स्वातंत्र्य संधिक्षणम् मधील पात्रे जशी त्या काळाचे प्रतिनिधित्व करणारी यथार्थवादी युगीन पात्रे आहेत तशीच ती प्रतिकात्मकही आहेत. म्हणून त्यांचा समावेश या प्रकारातही होतो.

४) **व्यक्तिगत पात्रे** - व्यक्तिगत पात्रांमधे ज्यांच्या व्यक्तिरेखेमधे काही विशिष्ट गुणधर्म, स्वभाववैशिष्टये आहेत त्यामुळे ती प्रेक्षकांच्या स्मरणात राहतात,ती पात्रे समाविष्ट केली जातात. उदा. भट्टसङ्कटम् मधील ब्राह्मण, चिपीटकचर्वणम् मधील कपाली, चौरचातुरियम् मधील घट कर, विवाहविडम्बनम् मधील रतिकांत इत्यादी.

५) **वर्गगत पात्रे** - वर्गगत पात्रांमधे ज्यांच्या विशिष्ट गुणधर्मामुळे ती समाजातील विशिष्ट वर्गाचे प्रतिनिधित्व करतात ती पात्रे मोडतात . उदा. रागविरागम् मधील राजा, विवाहविडम्बनम् मधील घटक, चौरचातुरियम् मधील घट कर.

श्री. जीव यांच्या प्रहसनात पुरुष पात्रे अधिक प्रमाणात आढळतात. त्यामानाने स्त्री पात्रे कमी प्रमाणात आहेत. त्यातही स्त्री पात्रांना विविधरंगी आणि व्यक्तिमत्वाने वेगवेगळे दाखवून स्त्री पात्रांमधे विविधता आणण्याचा प्रयत्न श्री. जीव यांनी केला आहे.

## स्त्री व्यक्तिरेखा :-

### १) घर्घरकण्ठा (विधिविपर्यासम्) :-

घर्घरकण्ठा ही या प्रहसनातील प्रमुख स्त्री व्यक्तिरेखा आहे. नारी उद्धार महिला संघाची सदस्य असलेल्या या स्त्रीने स्त्रीच्या उद्धारासाठी आमरण कुमारी राहण्याचा संकल्प केला आहे.

ममापि कौमार्य्यमामरणम् ।[४६]

तरुण वयातही ती अतिशय सुव्यवस्थितपणे विचार करणारी, तर्कसंगत विचार करणारी आणि बुद्धिमान स्त्री आहे.

तिचे स्त्री पुरुष समानतेविषयक अवास्तव विचार आहेत. स्त्रीही पुरुषांच्या बरोबरीने प्रत्येक क्षेत्रात कार्यरत आहे. त्यामुळे स्त्रीला अबला मानू नये. ती विनोद सुदंरशी याबाबत तर्कनिष्ठ वाद घालते. तिच्या बोलण्यातही विनोदसुंदरच्या बोलण्याप्रमाणेच पोकळपणा, फोलपणा दिसून येतो.

जेव्हा शल्यचिकित्सक ती आजन्म कुमारी राहणार असल्यामुळे तिचे प्रजनन अंग काढून दुसऱ्या स्त्रीला बसवण्याचे ठरवतो तेव्हा घाबरुन जाऊन ती आपला विवाह झाला असल्याचे खोटेच सांगते. तिला हेही जाणवते आहे की जर आपले स्त्रीत्त्व हिरावून घेतले गेले तर ज्या स्त्री समाजाच्या उद्धारासाठी ती प्रयत्न करत आहे तो स्त्री समाजही तिला झिडकारणारच आहे. समाजात तिला कोठेही स्थान असणार नाही.

घर्घरकण्ठेला शेवटी आपल्या चुकीचा पश्चात्ताप होतो. तिला असेही जाणवते की आपले विचार पोकळ असून या विचारांचा वास्तवात काहीही उपयोग नाही. जेव्हा सत्य परिस्थिती तिच्या समोर येते तेव्हा ती विनोदसुंदरची क्षमा मागते आणि नारीसुलभ लज्जेने ती विनोदसुंदरशी लग्न करण्यास तयार होते. भारतीय नारी असल्याचा गर्व आणि अभिमानही तिच्यात जागा होतो.

घर्घरकंठा ही स्त्री व्यक्तिरेखा आजच्या आधुनिक स्त्री समाजाचे प्रतिनिधित्व करते. ही आधुनिक स्त्री स्त्री पुरुष समानतेच्या अधिकाराचा दावा करते. परंतु स्त्री आणि पुरुष हे समाजाच्या दोन चाकाप्रमाणे आहेत हे ती विसरते. एकाच चाकावर जास्त भार देऊनही चालत नाही. स्त्री पुरुष हे एकमेकांना पूरक आहेत. या दोहोंशिवाय समाज व्यवस्था पूर्ण होऊ शकत नाही हे येथे दाखवून देण्यात आले आहे.

**कामिनी (भट्टसंकटम्) :-**

भट्टसंकटम् या प्रहसनातील ब्राह्मणपत्नी कामिनी ही या प्रहसनाची नायिका आहे. ती अतिशय कुरूप आणि कर्कशा स्त्री आहे. प्रहसनाचा नायक ब्राह्मण हा तिच्या स्वभावामुळे आणि वागण्यामुळे अतिशय त्रस्त झालेला आहे. यज्ञकर्मामध्ये पत्नी आवश्यक असते म्हणून केवळ तो तिची मनधरणी करत आहे.

तिला सकाळी सकाळी पतीचे मुखावलोकन करणे हाही मोठा अपशकुनच वाटतो. तिला पतीला सतत टोचून बोलण्याची सवय आहे. पतीचे आरशातील प्रतिबिंब पाहूनही तिला संताप येतो. अशा कर्कशा पत्नीचे हरण राक्षस करतात. ब्राह्मणाने केलेल्या यज्ञामुळे त्रस्त झाल्यामुळे राक्षस हे कृत्य करतात.

यज्ञकर्मासाठी पत्नी आवश्यक असल्याने तिची सुवर्णप्रतिमा बनवण्याचा किंवा दुसरे लग्न करण्याचा सल्लाही ब्राह्मणाला पटत नाही. ती कितीही कर्कशा असली तरी ब्राह्मणाचे तिच्यावर निरतिशय प्रेम आहे. ब्राह्मणापासून दूर गेल्यानंतर तिच्यावर अतिशय वाईट प्रसंग येतात. राक्षसांनी तिला पळवून नेल्यानंतर ते तिचे लग्न एखाद्या माकडाशी लावून देण्याच्या विचारात असतात.

या संकटातही ब्राह्मणच तिच्या मदतीला येतो. राक्षसांच्या तावडीतून तिला सोडवतोच शिवाय तिला कुरूपपणातून मुक्त करुन सुंदरताही मिळवून देतो.

**प्राच्य संस्कृती (स्वातन्त्र्य सन्धिक्षणम्) :-**

स्वातंत्र्य संधिक्षणम् या प्रहसनातील प्रमुख स्त्री पात्र असलेली प्राच्य संस्कृती ही भारतीय संस्कृतीचे प्रतीक आहे. भारतमातेची कन्या आणि नव्यत्रय आणि

माहम्मद यांची बहीण असलेल्या प्राच्य संस्कृतीचे अनेक गुण आहेत. दया, त्याग, अहिंसा, सांप्रदायिक एकता, करुणा याशिवाय भारतमातेविषयी तिचे असलेले अपार प्रेम या सर्व गुणांमुळे इतर मुलांपेक्षा ती अधिक वेगळी जाणवते.

तिला आपल्या आईला झालेली कुठलीही पीडा सहन होत नाही. ती आपल्या आईला खंडित झालेली पाहू शकत नाही. ती प्राणार्पण करूनही आईचे अखंडत्व वाचवू पाहते यावरुन तिचा सदाचारी स्वभाव जाणवतो. तिला आपली प्राचीन संस्कृती, रामायण, महाभारत इत्यादी महाकाव्ये याबद्दल अतिशय आदर आहे.

आपली संस्कृती विसरून विश्वासघात आणि कुटील राजकारण करणाऱ्या आंग्लांचे विचार मान्य असणाऱ्या नव्यत्रयांची तिला कीव येते. मात्र नव्यत्रय तिला केवळ तिरस्कृत करतात. त्यांची उपेक्षा सहन करूनही तिला त्यांच्याबद्दल ओढ वाटत राहते आणि स्वतः त्यांच्या विरुद्ध जाऊ शकत नाही. यतिवर्य हे तिचे समविचारी आहेत. त्यांच्याबद्दल तिच्या मनात आदर आहे.

भारतमातेच्या सन्मानासाठी, अखंडतेसाठी प्राणार्पण करण्याची तिची तयारी आहे. दया, करुणा, त्याग यांची मूर्तिमंत प्रतिमा असलेली प्राच्य संस्कृती अतिशय आदरणीय अशी व्यक्तिरेखा आहे.

**मन्दोदरी (दरिद्र-दुर्दैवम्) :-**

दरिद्र - दुर्दैवम् या प्रहसनाची प्रमुख स्त्री व्यक्तिरेखा असलेली मन्दोदरी वक्रेश्वर शर्मा या भिक्षूची पत्नी आहे. स्वभावाने मृदू असलेली परंतु पतीच्या नाकर्तेपणामुळे, कठोरहृदयीपणामुळे त्रासलेली ती एक सहनशील गृहिणी आहे पतीच्या टोमणे मारण्यामुळे आणि त्याच्या विचारहीन वागण्याने ती कंटाळलेली आहे. ती वस्तुतः अतिशय विचारी आणि क्षमाशील अशी पारंपरिक भारतीय स्त्री आहे. तिला पतीला उलटून बोलणेही मनाला पटत नाही. पण जेव्हा पती कौटुंबिक जबाबदाऱ्या झिडकारून जायला निघतो तेव्हा मात्र ती त्याला मागे खेचते.

दया, क्षमा, करुणा याचे मूर्तिमंत प्रतीक असलेली मन्दोदरी दारिद्रयाने त्रस्त आहे. आपल्या मुलांचे उपासमारीमुळे चाललेले हाल तिला पाहवत नाही. मातृसुलभ वात्सल्याने तिचे हृदय परिपूर्ण आहे. मुलांना पोटभर खायला मिळत नसतानाही

पतीने स्वतःसाठी तांदूळ वेगळे ठेवलेले पाहून त्याच्या स्वार्थी स्वभावाने ती व्यथित होते. तहानेने व्याकूळ होऊन चक्कर येऊन पडलेली मुले पाहून ती घाबरते.

तापसाने दिलेल्या पाश महिम्यामुळे जेव्हा त्यांच्यासोबत इतर गरीब भिक्षुकांचीही भिक्षापात्रे भरतात तेव्हा तिच्या पतीप्रमाणे ईर्ष्या, मत्सर न वाटता ती प्रसन्न होते. आपल्या सोबत इतरांचेही हित होत असेल तर त्यात आपल्याला वाईट वाटण्यासारखे काहीच नाही असे तिचे मत आहे.

आपल्यापेक्षा दुसऱ्याचा विचार करणारी, भारतीय स्त्री परंपरेचा वारसा चालवणारी मंदोदरी आदर्श भारतीय स्त्रीचा नमुना आहे.

**रंगिणी (चिपीटक चर्वणम्) :-**

या प्रहसनाची नायिका असलेली रंगिणी कपालीची पत्नी आहे. पतीच्या कंजूषपणामुळे व्यथित असली तरीही ती त्याची हितचिंतक आहे. पती कपाली जेवढा कंजूष आहे तेवढीच ती सहृदयी व उदार आहे. आपल्या पतीला श्वानदंशामुळे रक्तबंबाळ पाहून ती अतिशय घाबरते आणि प्रथम वैद्य व नंतर तांत्रिक यांना बोलावणे पाठवते. वैद्याने शुल्क मागितल्यानंतर ती सांगते की पती बरा झाल्यानंतर माहेरहून मिळालेले दागिने विकून का होईना पण त्यांचे शुल्क ती नक्की देईल. या प्रसंगात तिची पती परायणता दिसून येते.

पतीच्या कंजूषपणाचा तिला रागही येतो. ती तो पतीसमोर व्यक्तही करते. संवाद कुशल असलेली रंगिणी पतीच्या प्रत्येक वक्रोक्तीला त्याच्या तोडीस तोड उत्तर देते. त्याला टोमणेही मारते. कपालीच्या चिक्कूपणाने ती किती त्रासलेली आहे हे तिच्या बोलण्यातून जाणवते.

जानामि विधवास्यामिति .......... यास्यामि । [४७]

पतीच्या आचरणामुळे त्रासून त्याला टोचून बोलणारी रंगिणी मनातून मात्र त्याचे हित चिंतते त्याच्या बरे होण्याची आशा करते. तिला त्याला बोलणेही मनापासून आवडत नाही. इतकेच नव्हे तर आपल्या सदाचरणाने तिने शेजाऱ्या पाजाऱ्यांचीही मने जिंकली आहेत. त्यामुळे शेजाऱ्यांच्या मनात तिच्याविषयी आपुलकी

आहे. यामुळेच तर ती मांत्रिकाद्वारे पतीकडून दहा तोळे सोने प्राप्त करण्यात यशस्वी होते. यासाठी तिला शेजाऱ्यांचीही मदत होते.

अतिशय सुस्वभावी, सुंदर आणि सुशील पतिपरायण रंगिणी भारतीय परंपरेतील आदर्श स्त्री आहे.

**गौण स्त्री पात्रे**

गौण स्त्री पात्रांमधेही व्यक्तिरेखांमधे विविधता आहे.

स्वातंत्र्य संधिक्षणम् मधील **भारतमाता** ही स्त्री व्यक्तिरेखा अतिशय व्यापक आहे. आपल्या मुलांच्या सुख व स्वार्थाखातर तिला विभाजित व्हावे लागते. या वेळच्या तिच्या वेदना तिच्या शब्दातून व्यक्त होतात.

एकाहं कथं द्विधा भूत्वा द्वयो पुत्रयोः सन्तोषं विधास्यामि ।

परंतु प्राच्यसंस्कृती या तिच्या मुलीशिवाय तिचे पुत्र नव्यत्रय व माहम्मद यांना तिच्या वेदना जाणवत नाहीत. आपल्या मुलांच्या इच्छेसाठी तिला परकीयांकडून विभाजनाच्या वेदना व दुःख सहन करावे लागते.

विधि विपर्यासम् या प्रहसनातील **जंबालजिनी** ही आधुनिक स्त्री पुरुष समानतेचा उद्घोष करणारी व्यक्तिरेखा आहे. नावानुरुप शरीर सौष्ठव असलेली ही स्त्री काहीही करुन स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीचे अधिकार देवू पाहते. व्यायाम करणे, सेनेत भरती होणे, केस कापणे, तलवार चालवणे हे सर्व केल्यामुळे स्त्रीचे प्राचीन सहनशील व अबलेचे रूप मागे पडून आधुनिक स्त्री बनू शकेल जी या युगात पुरुषांच्या बरोबरीने उभी राहील असे तिचे मत आहे.

ही पात्रे प्रहसनामध्ये रंगमंचावरील अस्तित्वाच्या दृष्टिकोनातून गौण असली तरी घटनांच्या दृष्टिकोनातून महत्त्वाची आहेत.

**निष्कर्ष :-**

श्री. जीवन्यायतीर्थ यांनी आपल्या प्रहसनातून वेगवेगळी व्यक्तिमत्वे असलेल्या व्यक्तिरेखा साकारण्यात यश मिळाले आहे. एक किंवा दोन अंक असलेल्या प्रहसनातून

जरी त्या पात्रांचा पूर्ण स्वभाव रेखाटला गेला नसला तरी त्या त्या रुपकाशी संबंधित त्या त्या व्यक्तीच्या त्या स्वभाववैशिष्टयांवर प्रकाशझोत टाकला गेला आहे.

श्री. जीव न्यायतीर्थ यांचा दृष्टिकोन रूढी व परंपरा यांनी व्यापलेला वाटतो. कारण पुरुष प्रधान संस्कृती आणि स्त्रियांचे पारंपरिक आणि आदर्शवादी चित्रीकरण त्यांच्या प्रहसनातून दिसून येते. त्यांच्या स्त्री व्यक्तिरेखांमधील एकही व्यक्तिरेखा रुढी बंधने झुगारुन देणारी, वैचारिक व आर्थिक स्वातंत्र्य असलेली, स्वतःचे ठाम मत असलेली आणि स्वतःच्या पायावर उभी असणारी अशी नाही हे जाणवते.

पुरुष पात्रांमध्ये देखील सामाजिक बांधिलकी कमी आहे. वैयक्तिक स्वार्थ, उत्कर्ष यामधेच ती जास्त गुंतलेली दिसून येतात. ऐश्वर्य व उदारता एकत्र अशी एकही व्यक्ती त्यांच्या चित्रणात नाही. कंजुषपणा, मत्सर, ईर्ष्या ही पुरुष पात्रांची गुणवैशिष्टये आहेत.

या व्यक्तिरेखांच्या चित्रणावरून असे लक्षात येते की, समाजातील वाइट विचारांचे चित्रण येथे केले आहे. समाजात काय नको आहे,व्यक्तीच्या स्वभावात कोणते दुर्गुण नसावेत हे येथे स्पष्ट केले आहे.

निषेधत्मक रीतीने हे चित्रण करण्यात आले आहे. समाज दोषरहित होण्यासाठी,व्यक्ती सुसंस्कारित होण्यासाठी कोणते गुण हवेत आणि कोणत्या दुर्गुणांचा त्याग करणे गरजेचे आहे हे या व्यक्तिचित्रणावरून स्पष्ट होते.

संदर्भसूची


१) अभिनव नाटयशास्त्र पृष्ठ ११३

२) विधि विपर्यासम् पृष्ठ ५

३) विधि विपर्यासम् पृष्ठ ७

४) विधि विपर्यासम पृष्ठ २२

५) विवाहविडंबनम् पृष्ठ ७९

६) विवाहविडंबनम् पृष्ठ ९३

७) विवाहविडंबनम् पृष्ठ ७८

८) विवाहविडंबनम् पृष्ठ ९६

९) रामनामदातव्य चिकित्सालयम् पृष्ठ २

१०) चौरचातुरियम् पृष्ठ १३७

११) चौरचातुरियम् पृष्ठ १३९

१२) चौरचातुरियम् पृष्ठ २०

१३) चण्डतांडवम् पृष्ठ ४

१४) चण्डतांडवम् पृष्ठ ४

१५) चण्डतांडवम् पृष्ठ ६

१६) चण्डतांडवम् पृष्ठ ६

१७) चण्डतांडवम् पृष्ठ ६

१८) चण्डतांडवम् पृष्ठ ६

१९) स्वातंत्र्यसंधिक्षणम् पृष्ठ नंबर २५

२०) स्वातंत्र्यसंधिक्षणम् पृष्ठ नंबर २५

२१) स्वातंत्र्यसंधिक्षणम् पृष्ठ नंबर २६

२२) स्वातंत्र्यसंधिक्षणम् पृष्ठ नंबर ५७

२३) स्वातंत्र्यसंधिक्षणम् पृष्ठ नंबर ५७

२४) स्वातंत्र्यसंधिक्षणम् पृष्ठ नंबर ५७

२५) स्वातंत्र्यसंधिक्षणम् पृष्ठ नंबर ५६

२६) रागविरागम् पृष्ठ ३
२७) रागविरागम् पृष्ठ ७
२८) रागविरागम् पृष्ठ ५
२९) रागविरागम् पृष्ठ १८
३०) दरिद्रदुर्दैवम् पृष्ठ ३
३१) दरिद्रदुर्दैवम् पृष्ठ ६
३२) दरिद्रदुर्दैवम् पृष्ठ ८
३३) दरिद्रदुर्दैवम् पृष्ठ १२
३४) क्षुतक्षेमीयम् पृष्ठ २५
३५) क्षुतक्षेमीयम् पृष्ठ २६
३६) क्षुतक्षेमीयम् पृष्ठ ३१
३७) क्षुतक्षेमीयम् पृष्ठ ३४
३८) क्षुतक्षेमीयम् पृष्ठ ३३
३९) चिपीटकचर्वणम् पृष्ठ ५१
४०) चिपीटकचर्वणम् पृष्ठ ४४
४१) चिपीटकचर्वणम् पृष्ठ ५६
४२) चिपीटकचर्वणम् पृष्ठ ६१
४३) पुरुषरमणीयम् पृष्ठ ७
४४) पुरुषरमणीयम् पृष्ठ ११
४५) पुरुषरमणीयम् पृष्ठ ५
४६) विधिविपर्यासम् पृष्ठ १८
४७) चिपीटकचर्वणम् पृष्ठ ४३
४८) स्वातंत्र्यसंधिक्षणम् पृष्ठ ५६